सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३,
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/संस्थाविलिनीकरण/२०२३/ ८८६
दिनांक: - 6 OCT 2023

प्रति,

१. एम.एस.बिडवे इंजिनिअरींग कॉलेज, पो.ऑ.बॉक्स नं.११२, बार्शी रोड, लातूर — ४१३ ५३१ (पालक संस्था) (डीटीई कोड २१२९)

२. श्री महात्मा बसवेश्वर एज्यु.सोसायटीचे इन्स्टिटयूट ऑफ कॉम्प्युटर एज्युकेशन, एम.एस.बिडवे इंजि. कॉलेज कॅम्पस, बार्शी रोड, लातूर — ४१३ ५३१ (बालक संस्था) (डीटीई कोड २१२३)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या संस्था विलिनीकरण करण्यास मान्यता देणेबाबत.......**

**संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : क्र. मान्यता-२०२३/प्र.क्र.६३/तांशि-४, दि. ७.७.२०२३.**

अभियांत्रिकी पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी आणि व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या एका परिसरातील संस्थांना मान्यता दिलेली आहे. त्याआधारे विषयांकित संदर्भीन शासन निर्णयान्वयें एकाच व्यवस्थापनामार्फत व एका परिसरात सुरु असलेल्या खालील संस्थांना संस्था विलिनीकरणास शासन मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र | विलीन झालेल्या संस्थांची नावे व डीटीई कोड | विलिनीकरणा नंतर संस्थेचे नाव व डीटीई कोड़ | विलिनीकरणानंतर चालविण्यात येणारे अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता (२२-२३) | प्रवेश क्षमता (२३-२४) |
|---|---|---|---|---|---|
| १. | **पालक संस्था** २१२९ — एम.एस.बिडवे इंजिनिअरींग कॉलेज, पो.ऑ.बॉक्स नं.११२, बार्शी रोड, लातूर — ४१३ ५३१ | २१२९ — एम.एस.बिडवे इंजिनिअरींग कॉलेज, पो.ऑ.बॉक्स नं.११२, बार्शी रोड, लातूर — ४१३ ५३१ | **यूजी** | | |
| | | | १. सिव्हिल इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | | २.कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅन्ड इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | | ३. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग (इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड पॉवर) | ६० | ६० |
| | | | ४.इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | **बालक संस्था** २१२३ — श्री महात्मा बसवेश्वर एज्यु.सोसायटीचे इन्स्टिटयूट ऑफ कॉम्प्युटर एज्युकेशन, एम.एस.बिडवे इंजि. कॉलेज कॅम्पस, बार्शी रोड, लातूर — ४१३ ५३१ | | ५. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० | ६० |
| | | | ६. मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | ६० |
| | | | **पीजी** | ६० | ६० |
| | | | ७. मशिन डिझाईन | १८ | १८ |
| | | | ८. स्ट्रक्चरल इंजिनिअरींग | १८ | १८ |
| | | | ९. इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | १८ | १८ |
| | | | १०.कॉम्प्युटर इंजिनिअरींग | १८ | १८ |
| | | | ११. मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स | ६० | ६० |

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या एका परिसरातील उपरोक्त तक्त्यात नमूद संस्था विलिन करण्यास विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तसेच शासनाच्या मानकांप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसीत केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. आग प्रतिबंधक प्रमाणपत्राचे सक्षम प्राधिका-याकडून वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

५. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी / कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद / शासन / विद्यापीठ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

६. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, शासनाने, संचालनालयाने, संबंधीत विद्यापीठाने /महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास/ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति-

१.मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधिन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई — ४०० ००१.
३. मा.कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर
४. मा.कुलसचिव, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर
५. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
६. कार्यासन क्र. २-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
७. कार्यासन क्र. ३ (आय.टी.सेल), मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
८. निवड नस्ती.